गुंज बु येथील पूरग्रस्तांना अद्याप आर्थिक मदत नाही १९ जानेवारीपर्यंत मदत न मिळाल्यास तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

(बाळासाहेब ढेरे/ दै.धर्मयोध्दा)

घनसावंगी - तालुक्यातील गुंज बु येथे गोदावरी नदीला ऑगस्ट २०२५ मध्ये आलेल्या भीषण महापुरामुळे गावातील अनेक कुटुंबांचे संसार पूर्णतः उध्वस्त झाले होते. या पुरात अनेक घरे व दुकाने पाण्याखाली गेली होती. घरगुती साहित्य, अन्नधान्य तसेच जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते.पूरपरिस्थितीमुळे त्या काळात गावातील नागरिकांना दसरा व दिवाळीसारखे महत्त्वाचे सणही साजरे करता आले नव्हते

या गंभीर स्थितीची दखल घेत तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी पूरग्रस्त नागरिकांसाठी तातडीची आर्थिक मदत जाहीर केली होती. मात्र ही जाहीर केलेली मदत अद्यापही गुंज बु येथील पूरग्रस्त नागरिकांपर्यंत पोहोचलेली नाही, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पूरनुकसानीचे पंचनामे करताना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी न करता कार्यालयात बसूनच पंचनामे केल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

परिणामी अनेक पात्र व प्रत्यक्ष पूरग्रस्त नागरिक मदतीपासून वंचित राहिले असून आजतागायत त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळालेली नाही.या पार्श्वभूमीवर समस्त पूरग्रस्त नागरिकांनी तहसीलदार, घनसावंगी यांना निवेदन सादर करून या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालण्याची मागणी केली आहे. गावातील सर्व पात्र पूरग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी ठाम व जोरदार मागणी निवेदनात करण्यात आली आहे.दरम्यान, १९ जानेवारी २०२६ पर्यंत पूरग्रस्तांना आर्थिक मदत न मिळाल्यास गावातील पूरग्रस्त नागरिक कुटुंबासह तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.या निवेदनावर रवींद्र अर्दड, गोपाळ राजुरकर, माऊली कचरे, परमेश्वर घुगांसे, भागवत मोरे, शेख अकबर, भगीरथ घुगांसे, सोनाजी बिजुले, बन्नू कचरे, कचरू बिजुले, अंकुश कानडे, अंकुश राऊत, बाळू गायकवाड, बाळू नव्हेरकर, कृष्णा पंचलोटे, अर्जुन लोंढे, राजाभाऊ लोंढे, रामा डोळसे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनसे चौकातील एमआयडीसीच्या भूखंडावर लवकरच वृक्षलागवड वृक्षप्रेमींच्या मागणीला व 'दै. धर्मयोद्धा'च्या पाठपुराव्याला यश

(गजानन राऊत/ दै.धर्मयोध्दा)

दैनिक धर्मयोध्दा

एमआयडीसी वाळूज हद्दीतील निष्काशीत अतिक्रमणे पुन्हा एमआयडीसीच्या उंबरठ्यावर

अतिक्रमण प्रतिबंध प्रत्यक्ष उपाय योजना अंमलबजावणीची गरज

(गजानन राऊत/ दै.धर्मयोध्दा)

वाळूज महानगर - गत वर्षी ऑगस्ट महिन्यात एमआयडीसी प्रशासनने दोन दिवसांची धडक कारवाई करत औद्योगिक व नागरी वसाहतींमधील तब्बल ११०० पेक्षा अधिक अतिक्रमणे हटवली होती. या कारवाईनंतर भविष्यात ओपन स्पेस भूखंडांवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी संबंधित भूखंडांभोवती काटेरी तारांचे कुंपण किंवा कंपाउंड वॉल उभारण्याची शास्वती एमआयडीसी प्रशासनाने दिली होती मात्र अतिक्रमणे निष्काशीत केलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने निष्काशीत अतिक्रमणे पुन्हा वाढत असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे वाळूज औद्योगिक नगरीतील मनसे चौकातील भूखंड क्र. ५ (क्षेत्रफळ २६०७ स्केअर मीटर) पुन्हा अतिक्रमणाच्या विळ्ळ्यात सापडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या मोकळ्या भूखंडावर काही हरितपट्टा वाढेल, प्रदूषणात घट होईल आणि औद्योगिक परिसराचा पर्यावरणीय समतोल राखला जाईल- विष्णुदास पाटील (सह्याद्री वृक्ष बँक)

मोकळे झालेले भूखंड पुन्हा बळकावले जाऊ नयेत, यासाठी त्या ठिकाणी तातडीने वृक्षलागवड करणे आवश्यक आहे वाळूज औद्योगिक नगरीत हरित पट्ट्याची संख्या अत्यंत कमी असून, अतिक्रमण काढलेल्या मोकळ्या भूखंडांवर वृक्षलागवड केल्यास उपाययोजना न केल्याने प्रदूषण व सांडपाणी यासारख्या दोन संवेदनात्मक मुद्दयांवर होणारे परिणाम लक्षात घेता तर औद्योगिक परिसरामध्ये नागरी वसाहतीत अतिक्रमणाची परिस्थिती उद्भवणार नाही- अर्जुन गायकवाड(मसीआ, अध्यक्ष)

अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर संबंधित ठिकाणी पुन्हा अतिक्रमण आढळून आल्यास अतिक्रमण करणाऱ्या संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतील.अतिक्रमणाचा धोका लक्षात घेता, लवकरच पाहणी करून आवश्यकतेनुसार पुन्हा अतिक्रमण हटाव मुहीम हाती घेण्यात येईल'' -अमित भासे (प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी)

अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मोठ्या प्रमाणात वेळ, मनुष्यबळ व कर्मचारी बळ खर्च केले जाते. मात्र, त्यानंतर कुंपण उभारणी, सूचना फलक,नियमित गस्त व सातत्यपूर्ण देखरेख यांसारख्या दोन संवेदनात्मक उपाययोजना न केल्याने प्रश्न व्यर्थ ठरत आहेत. त्यामुळे एमआयडीसी प्रशासनने कायमस्वरूपी उपाययोजना केल्या तर औद्योगिक परिसरामध्ये नागरी वसाहतीत अतिक्रमणाची परिस्थिती उद्भवणार नाही- अर्जुन गायकवाड(मसीआ, अध्यक्ष)

व्यावसायिक व नागरिकांकडून सांडपाणी कचऱ्याचे ढिगारे टाकले जात असून, भूखंडांभोवती संभोवती बँरखाडी व जाहिरात फलक उभारले जात आहेत. यासंबंधी अतिक्रमणाच्या मुद्दयाने व्यावसायिक टाकण्याचे प्रकारही वाढले असून, हा भूखंड पुन्हा बळकावला जाण्याची भीती व्यक्त होत आहे. महापाणा प्रसाद चौकातील मीनाताई ठाकरे मार्केट परिसरात काढण्यात आलेली अनधिकृत अतिक्रमणे पुन्हा ''जैसे थेच'' झाली आहेत मीनाताई ठाकरे मार्केट परिसरात अनधिकृत लोखंडी टपऱ्या उभारून अवैध व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.बजाज नगरातील मोरे चौक,मोहटादेवी चौक, परिसरात पुन्हा काही अवैधरित्या लोखंडी तळ ठोकल्याची पुन्हा हे वर्दळलेले चौक अतिक्रमणाच्या विळ्ळ्यात अडकली आहेत यामुळे वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

मोरे चौक व मोहटादेवी चौक परिसरात पुन्हा झालेल्या अतिक्रमणामुळे दोरोज वाहतूक कोंडी होते. अपघातांच्या वेळी ॲम्बुलन्सलाही मार्ग मिळत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. एमआयडीसी प्रशासनने तातडीने लक्ष देऊन मुख्य रहदारी रस्त्यांच्या कडेला असलेली अतिक्रमण हटवून मुख्य रस्त्यांसहित चौक मोकळे करावेत.'' वेगेकडन वाहतूक कोंडी होणार नाही'' - मनोज जैन (अध्यक्षतरास मदतनीस)

06 Jan 2026 - Page 3 | www.dharmayoddha.com
Powered by softisky | 9764331134

वाळूजमहानगर - एमआयडीसी वाळुज औद्योगिक नगरीतील मनसे चौक परिसरातील एमआयडीसीच्या मोकळ्या भूखंडावर लवकरच वृक्षलागवड करण्यात येणार आहे. अतिक्रमणमुक्त करण्यात आलेल्या या भूखंडावर हरित पट्टा विकसित करण्याचा निर्णय एमआयडीसी प्रशासनाने घेतला असून, या निर्णयामुळे परिसरातील पर्यावरणाला नवी दिशा मिळणार आहे.

गतवर्षी ऑगस्ट महिन्यात एमआयडीसी प्रशासनाने दोन दिवसांची धडक कारवाई करत औद्योगिक व नागरी वसाहतींमधील तब्बल ११०० हून अधिक अतिक्रमणे हटवली होती. या कारवाईनंतर भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी ओपन स्पेस भूखंडांभोवती काटेरी तारांचे कुंपण किंवा कंपाउंड वॉल उभारण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात उपाययोजना न झाल्याने काही ठिकाणी पुन्हा अतिक्रमण वाढत असल्याचे चित्र दिसून येत होते.

याबाबत वाळुज महानगरातील विष्णुदास पाटील (सह्याद्री वृक्ष बँक) तसेच मसीआ संघटनेचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. वाढत्या अतिक्रमणाच्या धोक्याकडे लक्ष वेधत 'दै. धर्मयोद्धा'ने सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल घेत एमआयडीसी प्रशासनाने तात्काळ निर्णय घेत अतिक्रमणमुक्त केलेले काही ओपन स्पेस भूखंड वृक्षलागवडीसाठी वापरण्याचे स्पष्ट केले.

त्यानुसार एमआयडीसी वाळुज औद्योगिक नगरीतील मनसे चौकातील भूखंड क्रमांक ७ (क्षेत्रफळ २६०७ स्क्वेअर मीटर) येथे लवकरच वृक्षलागवड करण्यात येणार आहे. एमआयडीसीच्या नियमावलीनुसार या भूखंडावर वृक्षलागवडीसाठी शार्प इंजिनिअरिंग या कंपनीने पुढाकार घेतला आहे.

या उपक्रमामुळे मनसे चौक परिसरातील हरित पट्ट्यांना नवसंजीवनी मिळणार असून, पर्यावरण संवर्धनाला चालना मिळणार आहे. एमआयडीसी प्रशासनाच्या या निर्णयाचे परिसरातील वृक्षप्रेमी व पर्यावरणप्रेमींनी स्वागत केले आहे.

न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी

(विजय राठोड/ दै.धर्मयोध्दा)

परतूर - न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे जिजामाता आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष नारायण दादा सोळंके यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी सचिव छाया बागल आणि मुख्याध्यापक गोविंद पाठक, उप मुख्याध्यापक पुजा मोरे आवर्जून उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक गोविंद पाठक म्हणाले कि, ज्यांनी आपल्या स्वराज्याचे स्वप्न बघितले आणि फक्त बघितलेच नाही तर ते सत्यात देखील उतरविले, त्या म्हणजे आपल्या माँसाहेब जिजाऊ. प्रत्येक मातेने आपल्या पाल्यास राजमाता जिजाऊ सारखे संस्कार देणे काळाची गरज आहे. तसेच ते स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर बोलतांना म्हणाले कि, स्वामी विवेकानंद यांनी आपल्या विचारांमुळे स्वत:ची एक वेगळी ओळख बनवली. भारत तरुणांचा देश असून या तरुणांना स्वामी विवेकानंद यांचे विचार योग्य दिशा देतील. यावेळी नर्सरी ते नववीच्या विद्यार्थीनि जिजामाता यांची वेशभूषा करुन आल्या होत्या तसेच विद्यार्थी विवेकानंद यांची वेशभुषा करुन आले होते. यावेळी प्रत्येक हाऊस च्या तीन विद्यार्थ्यांनी जिजामाता आणि स्वामी विवेकानंद यांच्या जिवन चरित्रावर आधारित भाषणे केली. अभिषेक आरसाड, अतेशाम खान आणि गीता पायघन यांनी जिजामाता आणि स्वामी विवेकानंद यांच्या जिवन चरित्रावर आधारित भाषणे करून विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश साठे यांनी केले तर आभार प्रदर्शन दामिनी टाकणखार यांनी व्यक्त केले.

यावेळी शाळेचा सर्व कर्मचारी वर्ग आवर्जून उपस्थित होता. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष हरकळ, महादेव कदम, सुलेमान सय्यद, गोपीनाथ जगदाळे, किशोरी जोशी, मंगल वेडेकर, शारदा चव्हाण, शालू पारखे, आरती सारस्वत, ज्योतिका जगताप, सेविका ज्योती निलेवाड पार्वती, गुंजमूर्ती आणि सेवक सुखदेव सस्ते यांनी प्रयत्न केले.

राजमाता जिजाऊ : मातृत्व नेतृत्व व कर्तृत्वाचे प्रतीक - प्रा. डॉ. रेखा ढेरे-घोलप

(बाळासाहेब ढेरे/ दै.धर्मयोध्दा)

घनसावंगी - राजमाता जिजाऊ या केवळ शिवरायांच्या माता नव्हत्या, तर त्या मातृत्वातून कर्तृत्व आणि नेतृत्व घडविणाऱ्या राष्ट्रमातेच्या भूमिकेत होत्या, असे प्रतिपादन प्रा. डॉ. रेखा ढेरे-घोलप यांनी केले. ''राजमाताराष्ट्रमाता आई जिजाऊ व स्वामी विवेकानंद या विषयावर त्यांनी केलेली अभ्यासपूर्ण मांडणी उपस्थितांना अंतर्मुख करणारी ठरली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रमाधिकारी डॉ. सर्जे राव ताठे होते. व्यासपीठावर डॉ. राधेश्याम राऊत, डॉ. सुनील सामग, प्रा. डॉ. राजेंद्र मोरे व डॉ. सुनील शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. ढेरे-घोलप म्हणाल्या की, स्वराज्याची पायाभरणी जिजाऊंच्या संस्कारातून झाली. त्यांच्या विचारांतून राष्ट्रभक्ती, न्याय आणि समतेची बीजे रोवली गेली. शिवरायांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची, शोषित-वंचितांचा आवाज होण्याची शिकवण जिजाऊंनी दिली. स्वराज्यावर संकटांची मालिका आली असतानाही त्यांनी खंबीरपणे राज्यकारभार सांभाळला. 'रयतेचे राज्य' ही लोककल्याणकारी संकल्पना जनमानसात रुजवून स्वराज्य उभारणीत त्यांनी निर्णायक भूमिका बजावली. आजच्या महिलांसाठी जिजाऊ या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नसून आत्मसन्मान, कर्तृत्व आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी विवेकानंदाच्या कार्यावरही प्रकाश टाकला. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने झाली. प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. रेखाताई यांचा सत्कार डॉ. सर्जेराव ताठे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले. स्वागतगीत श्रेया ढेरे यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुनील सामग यांनी मानले. या कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शालेय समितीचे पदाधिकारी, प्रा. योगेश पल्लेवाड, प्रा. जयश्री गोफने, प्रा. सुजाता मिराशे, प्रा. विवेक पाटील, रूपाली पाटील प्रा. रूपाली पाटील ,आशाताई केवट, श्री. कल्याण अडाळे, विद्यार्थी प्रतिनिधी सुजल ढेरे, श्रेया ढेरे, जावेद शेख यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक व गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

डिपेक्स - २०२६ च्या स्वागत समिती अध्यक्ष पदी ना. श्री. अतुल सावे, कार्याध्यक्ष पदी श्री. मुनिष शर्मा तर सचिव पदी डॉ.अनंत पंढर

(नवनाथ गव्हाणे/दै.धर्मयोध्दा)

बदनापुर - व 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेवर आधारित ३५ वे डिपेक्स होणार छत्रपती संभाजीनगर महानगरात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व सृजन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ४० वर्षांपासून अधिक काळ सातत्याने आयोजित करण्यात येणारे डिपेक्स हे राज्यस्तरीय विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक नवकल्पनांची प्रदर्शन यावर्षी दिनांक ५ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सृजन ट्रस्ट, महाराष्ट्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी ३५ वे डिपेक्सचे आयोजन होत असून, हे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी स्वतः संकल्पित, नियोजित व व्यवस्थापित केलेले आणि विद्यार्थ्यांसाठीच राबविण्यात येणारे एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक व सामाजिक चळवळ म्हणून ओळखले जाते. डिपेक्स फक्त प्रदर्शन पुरतेच मर्यादित नसून त्यातून सहभागीतांना या संकल्पनेस धरून त्यांच्या प्रकल्पांना उद्योगाचे स्वरुप प्राप्त करून देण्यास अभाविप व सृजन सहाय्य करीत असते. डिपेक्स मध्ये भविष्यवेधी तंत्रज्ञान, उद्योजकता अशा विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्रे ही आयोजित केले जाणार आहेत अशी माहिती प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे यांनी दिली.

डिपेक्स च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनात्मक व नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष स्वरूप देण्याची संधी उपलब्ध होते. विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, सामाजिक विज्ञान तसेच औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रकल्पांद्वारे विद्यार्थी समाजासमोरील ज्वलंत प्रश्नांवर उपाय सुचवितात. महाराष्ट्र व गोवा राज्यातील अभियांत्रिकी, डिप्लोमा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा शैक्षणिक संस्थांमधील हजारो विद्यार्थी या प्रदर्शनात सहभागी होणार असून, त्यांचे प्रकल्प तज्ज्ञ, उद्योजक, शिक्षक व नागरिकांसमोर सादर करण्यात येणार आहेत.

यावर्षी डिपेक्स - २०२६ ची मध्यवर्ती संकल्पना ''ग्रामीण विकासातील सामाजिक नवकल्पना आणि विकसित भारत २०४७'' अशी निश्चित करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, पाणी व्यवस्थापन, शेती, ऊर्जा, रोजगारनिर्मिती, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शाश्वत विकास तसेच सामाजिक उद्योजकता या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प प्रदर्शनात सादर केले जाणार आहेत. 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेशी सुसंगत अशी युवकांची भूमिका, विचारशक्ती व राष्ट्रनिर्मितीतील योगदान डिपेक्सच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर आज छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत डिपेक्स - २०२६ साठी महानगरातील मान्यवर व्यक्तींची स्वागत समिती अभाविप प्रदेश उपाध्यक्ष प्रा. योगिता पाटील यांनी घोषीत केली. महानगरातील सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, व्यावसायिक, सांस्कृतिक व सार्वजनिक जीवनातील अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्तींनी या समितीत सहभाग नोंदवून डिपेक्स उपक्रमाला मार्गदर्शन व पाठबळ देण्याची भूमिका स्वीकारली आहे. यात अध्यक्ष म्हणुन आ.ना. अतुल सावे, कार्याध्यक्ष - श्री. मुनिष शर्मा, उपाध्यक्ष - श्री. अतुल चव्हाण, सौ. मैथिली तांबोळकर, श्री. निखिल खिंवसरा, श्री. राहुल पगारिया, श्री. केदार देशपांडे, संरक्षक -खा. डॉ. भागवत कराड, श्री. उमेश दाशरथी, मार्गदर्शक सदस्य - श्री. रामचंद्र भोगले, श्री. ऋषी बागला, श्री. मानसिंग पवार, श्री. बी. एस. खोसे, सचिव - डॉ. अनंत पंढरे, सह सचिव - श्री. प्रवीण घुगे, सदस्य सौ. मोहिनी केळकर, श्री. गिरीधर संगानेरिया, श्री. चंद्रकांत गव्हाणे, श्री. मुकुंद कुळकर्णी, श्री. विवेक भोसले, श्री. आशिष भाला, श्री. सुनील किर्दक, श्री. मंगेश निटुरकर, श्री. मिलींद कंक, श्री. प्रसाद कोकीळ, सौ. कमल राव, श्री. आशिष गर्दे, श्री. दुष्यंत पाटील,श्री. सौरभ भोगले, श्री. हर्षवर्धन कराड, श्री. मिहीर वैद्य, श्री. रोहित दाशरथी, श्री. सचिन वैद्य, श्री. रोहित देशपांडे, श्री. अक्षय हुलसुरकर, श्री. अमोघ बारगजे, श्री. दिपक गोयल, श्री. प्रियांक चोप्रा, प्रा. रमेश जयभाये, चिन्मय महाले हे असतील.

यावेळी स्वागत समिती कार्याध्यक्ष अध्यक्ष मा. मुनिष शर्मा यांनी सांगितले की, ''डिपेक्स ही केवळ विज्ञान प्रदर्शनी नसून विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवेचा, संशोधनशील दृष्टिकोनाचा व राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाचा प्रभावी आविष्कार आहे. ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी मांडलेले नाविन्यपूर्ण उपाय भविष्यात धोरणात्मक दृष्ट्या मार्गदर्शक ठरू शकतात. 'विकसित भारत २०४७' या संकल्पपूर्तीसाठी युवकांची ऊर्जा व नवकल्पना अत्यंत महत्त्वाची असून, डिपेक्स हे त्यासाठी प्रभावी व्यासपीठ आहे.''

अभाविप व सृजन ट्रस्ट यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्व नागरिक, पालक, शिक्षक, उद्योजक, संशोधक व विद्यार्थ्यांना डिपेक्स - २०२६ ला मोठ्या संख्येने भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन सृजन ट्रस्ट अध्यक्ष श्री. रामचंद्र भोगले यांनी केले. या पत्रकार परिषदेस प्रदेश उपाध्यक्ष प्रा. योगिता पाटील, प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे, स्वागत समिती सचिव डॉ. अनंत पंढरे, सृजन ट्रस्ट सचिव श्री. शाम अर्जुनवाडकर, डिपेक्स संयोजक कणक कवडिवाले उपस्थित होते.

अंबडमध्ये 'खेलो भारत' अंतर्गत गोळा फेक स्पर्धेचा थरार १७० खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग; परमेश्वर तारगे व गीता राठोड प्रथम

(नवनाथ गव्हाणे/ दै.धर्मयोध्दा)

बदनापुर- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) शाखा अंबड यांच्या वतीने 'खेलो भारत' उपक्रमांतर्गत भव्य गोळा फेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील दत्ताजी भाले माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील तब्बल १७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले. चुरशीच्या आणि अटीतटीच्या लढतीत मुलांच्या गटात परमेश्वर तारगे, तर मुलींच्या गटात गीता राठोड हिने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. निकाल पुढीलप्रमाणे मुलांचा गट: प्रथम परमेश्वर तारगे द्वितीय शिवाजी रेठे तृतीय अविनाश राठोड मुलींचा गट: प्रथम गीता राठोड द्वितीय अश्विनी डावकर तृतीय साक्षी बडवणे

मार्गदर्शन व उपस्थिती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अंबड पोलीस ठाण्याचे पीएसआय ढाकणे साहेब व पोलीस कॉन्स्टेबल मुळक साहेब उपस्थित होते. यावेळी पीएसआय ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''केवळ अभ्यासातच नव्हे तर मैदानी खेळातही युवकांनी करिअर घडवावे. खेळामुळे शिस्त, जिद्द व आत्मविश्वास निर्माण होतो.'' तसेच पोलीस दलातील करिअर संधींबाबतही त्यांनी माहिती दिली. बक्षीस वितरण बक्षीस वितरण समारंभ नगरसेविका सवितताई कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहित करताना जिजाऊंच्या संस्कारांची आठवण करून देत, ''आजच्या युवती शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत,'' असे मत व्यक्त केले. आयोजन व संयोजन कार्यक्रमाचे प्रास्ताविक जालना जिल्हा संयोजक तथा प्रांत 'खेलो भारत' सहसंयोजक पवन नरवडे यांनी केले. शहर मंत्री अजित उबाळे यांनी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची ग्वाही दिली. सूत्रसंचालन नंदिनी शिंदे व जयश्री गीते यांनी केले, तर आभार प्रदर्शन अजित उबाळे यांनी मानले. स्पर्धेसाठी पंच म्हणून बाळानाथ माळी, गोकुळ सर, सम्राट सर, वाघ सर व जगताप सर यांनी काम पाहिले. कार्यक्रमास शहरातील मान्यवर, क्रीडाप्रेमी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ठळक माहिती ठिकाण: दत्ताजी भाले माध्यमिक विद्यालय, अंबड सहभागी: १७० विद्यार्थी आयोजक: अभाविप, अंबड (खेलो भारत उपक्रम)

महिलांच्या कलेतून सामाजिक परिवर्तनाचा संदेश; रांगोळी व सेल्फी स्पर्धा संपन्न

(विवेक भुत्तेकर/दै.धर्मयोध्दा)

मंठा - येथे आयोजित रांगोळी व सेल्फी स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत तब्बल १०३९ महिलांनी सहभाग नोंदवला असून १०४ बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. मंदाताई बबनराव लोणीकर व सौ. दिव्या राहुल लोणीकर यांच्या हस्ते झाले, तर बक्षीस वितरण माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत पार पडले. रांगोळी स्पर्धेत देशभक्ती, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, राम मंदिर, महिलांवरील अत्याचार, सोशल मीडियाचा दुष्परिणाम आदी सामाजिक व राष्ट्रीय विषय मांडण्यात आले. महिलांच्या विचारशक्ती व सामाजिक भानाचे प्रभावी दर्शन या माध्यमातून घडले. स्पर्धेचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांनी काटेकोरपणे केले. यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, 'लाडकी बहीण' उपक्रम महिलांच्या सशक्तीकरणाचा भक्कम आधार असून महिला सक्षम झाल्या तर समाज व देश सक्षम होतो. महिलांच्या शिक्षण, सुरक्षितता व आत्मनिर्भरतेसाठी आम्ही सदैव पाठीशी उभे राहू, असे आश्वासन त्यांनी दिले.स्पर्धेत प्रथम बक्षीस स्कुटी सौ.वंदना वैजनाथ बोराडे यांच्या वतीने देण्यात आले. अन्य क्रमांकांसाठी फ्रिज, वॉशिंग मशीन, मिक्सर, कुकर, डिनर सेट, इलेक्ट्रिक शेगडी तसेच सेल्फी स्पर्धेसाठी २१ पैठणींची बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमास राहुल लोणीकर, मंदाताई लोणीकर, दिव्या लोणीकर, अंकुशराव बोराडे, अंकुशराव अवचार, बाबुराव शहाणे, सतीशराव निर्वळ, नितीन राठोड, गणेशराव खवणे, शिवाजीराव खंदारे, पंजाबराव बोराडे, संपत टकले, विठ्ठलराव काळे, शिवाजीराव जाधव, अमोल मोरे, राजाभाऊ खराबे, नागेशराव घारे, पंजाबराव पुणेकर, रावसाहेब बाहेकर, विष्णुपंत बाहेकर, माऊली गुंडगे, पांडुरंग चव्हाण, वैभव नरवडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजक, सहप्रायोजक, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.